जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2020
लोकमत

# ८३० विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एमबीए (रूरल मॅनेजमेंट)सह अन्य अभ्यासक्रमांसाठी रविवारी ८३० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा दिली. त्यासाठी एकूण १२६७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. एम. एस्सी. बायो केमिस्ट्री, बायो टेक्नॉलॉजी, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, मास्टर ऑफ रूरल स्टडीज्, एम. एस. डब्ल्यू (रूरल कम्युनिटी), एमबीए (डिस्टन्स मोड), आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षा घेण्यात आली. दरम्यान, एम. एस्सी. पर्यावरणशास्त्र, फूड सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी, एम. टेक (रूरल टेक) या अभ्यासक्रमांसाठी शनिवारी प्रवेश परीक्षा झाली. या परीक्षेसाठी एकूण ७८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2020
पुण्यनगरी

# 'पदव्युत्तर'साठी ८३० विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामार्फत पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश परीक्षा रविवार, दि. २२ रोजी विविध केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेसाठी एकूण १,२६७ इतक्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी ८३० विद्यार्थी परीक्षेस बसले. यामध्ये प्रामुख्याने एम.एस्सी. बायोटेक्नोलॉजी, एम.एस्सी. एमआरएस आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. पुणे, सोलापूर व बेळगाव येथील केंद्रांवर परीक्षा पार पडल्याची माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2020
पुढारी

# पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी ८३० विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामार्फत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. १२६७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी ८३० परीक्षार्थी उपस्थित राहिले. विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा सुरू आहेत. रविवारी एम.एस्सी. बायोकेमेस्ट्री, बायोटेक्नॉलॉजी, एम.एस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, एम.आर.एस. एम.बी.ए., एम.एस.डब्ल्यू. आदी अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा झाल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2020
लोकमत

# विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे दहा टक्के शुल्क माफ

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांमार्फत स्वावलंबी तत्त्वावर काही पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत. या अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क हे विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयामधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना १० टक्के माफ करण्यास विद्यापीठाच्या प्रशासनाने मान्यता दिली आहे.

ही सवलत विद्यापीठ परिसर, परिक्षेत्रातील महाविद्यालय, विविध अधिविभाग, कार्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना लागू राहणार आहे.

ही सवलत मिळणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यास नियमाप्रमाणे इतर शुल्क लागू राहणार आहे. ज्या विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीने विद्यापीठातील स्वावलंबी अभ्यासक्रमास प्रवेश घेताना इतर कोणत्याही शासकीय योजनांचा शुल्कातील सवलतीसाठी लाभ घेतला असल्यास त्यास १० टक्के शुल्कमाफीची सवलत मिळणार नाही, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.